# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 10.11.2024** **वार – रविवार**

---

**प्रचार**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, आज रविवारच्या सुट्टीचा दिवस साधत, पुणे शहरात विविध पक्षांच्या उमेदवारांनी जोरदार प्रचार केला.
मला सत्तेचा सोस नाही, तर महाराष्ट्राला सुजलाम सुफलाम करायचेय, म्हणून माझ्या हाती एकदा सत्ता द्या, अशी साद महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज पुण्यात दिली.
कसबा मतदारसंघातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार गणेश भोकरे यांच्या प्रचारार्थ आयोजित, जाहीर सभेत राज ठाकरे बोलत होते. फडके हौद चौकात झालेल्या सभेवेळी मनसेचे प्रवक्ते अविनाश अभ्यंकर ,अनिल शिदोरे, उमेदवार गणेश भोकरे, आदि उपस्थित होते
राज ठाकरे पुढ म्हणले की पुण्यातील कसब्याला ऐतिहासिक वारसा आहे. माँ जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराजांनी याच भूमीत सोन्याचा नांगर फिरवून, हे शहर वसवल होते. आज अस्ताव्यस्त वाढलेले हे शहर अनेक समस्यांनी ग्रस्त आहे. जय शिवाजी अशा घोषणा देऊन चालणार नाही, तर इतिहास समजून घेऊन तो जपण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असही राज ठाकरे म्हणाले

पर्यावरण दिनाव्यतिरिक्त 'एक पेड माँ के नाम' उपक्रमांद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदीनी पर्यावरण रक्षणासाठी चळवळ उभारली. पालकमंत्री नात्याने रस्त्याच्या कामाला स्थगितीच दिली आहे, तरीही निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर टेकडीचा मुद्दा काढून संभ्रम निर्माण केला जात असल्याची भावना , कोथरूड विधानसभा मतदारसंघातील भाजपा महायुतीचे उमेदवार चंद्रकांत पाटील यांनी आज व्यक्त केली.

त्यांनी आज ए आर ए आय टेकडीवर जाऊन, टेकडीवर येणाऱ्या नागरिकांशी संवाद साधला आणि भारतीय जनता पक्षाची भूमिका मांडली

ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा असलेल्या पर्वतीचे जतन आणि संवर्धन करून आपला वैभवशाली वारसा आणि संस्कृती जपता आली. त्यासाठी राज्य शासनाचा विशेष निधी उपलब्ध करून दिल्याची माहिती महायुतीच्या पर्वती मतदारसंघातील उमेदवार माधुरी मिसाळ यांनी दिली. मिसाळ यांच्या प्रचारार्थ लक्ष्मीनगर, म्हाडा कॉलनी, पर्वती गाव,परिसरात प्रचार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी ही माहिती दिली.

नागरिकांच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी कसबा मतदार संघातील भाजपचे उमेदवार हेमंत रासने यांचे जनसंपर्क कार्यालय सर्वसामान्यांचा आधार ठरत असून, एक कॉल प्रॉब्लेम सॉल्व्ह योजना यशस्वी ठरत असल्याच्या भावना नागरिकांनी व्यक्त केल्या.

सदाशिव पेठ परिसरात आज रासने यांच्या प्रचार फेरीचे आयोजन करण्यात आल.
एक कॉल प्रॉब्लेम सोल या योजनेअंतर्गत सात हजारहून अधिक नागरिकांची विकास कामे मार्गी लावली असल्याची  माहिती हेमंत रासने यांनी दिली

राष्ट्रवादी आध्यात्मिक आणि वारकरी आघाडी, महाराष्ट्र राज्य संपूर्ण महाराष्ट्रभर भजन, कीर्तन आणि प्रवचनाच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा प्रचार करणार आहे. या प्रचार वारीची सुरुवात  पुण्यातील पत्रकार भवन येथून झाली. हरिनामाचा गजर करीत, वारकऱ्यांनी सर्वधर्मसमभाव जपणाऱ्या महाविकास आघाडीला निवडून देण्याचे आवाहन केले.

राष्ट्रवादी आध्यात्मिक  वारकरी आघाडीचे प्रमुख हभप विठ्ठल  मोरे, राज्य उपाध्यक्ष हभप मुबारक शेख, यांच्यासह टाळ, मृदुंग, वीणा घेऊन शेकडो वारकरी यामध्ये सहभागी झाले आहेत.

पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार रमेश बागवे यांना पुणे शहरातील आठही विधानसभा मतदारसंघातील इतर उमेदवारांपेक्षा सर्वाधिक मताधिक्य देऊन विजयी करण्याचा निर्धार आज विविध पक्ष संघटनांमध्ये कार्यरत असलेल्या आंबेडकरी कार्यकर्त्यांकडून करण्यात आला.
रिपब्लिकन युवा मोर्चा आणि  महाविकास आघाडी यांच्या संयुक्त विद्यमाने आज नवयुग बँक्वेट हॉल इथ आंबेडकरी कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला होता.

पुणे जिल्ह्यातील विविध मतदान केंद्रावर मतपेट्या वाहून नेण्यासाठी  महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडे म्हणजेच एसटीकडे  ५०० बसची मागणी करण्यात आली आहे. त्यानुसार पुणे एसटी

विभागातून बस पुरविण्याचे नियोजन सुरू केले आहे, अशी माहिती पुणे विभाग नियंत्रक प्रमोद नेहूल यांनी दिली.

वंदे मारतम्’च्या निर्मितीचे 150वे वर्ष सुरू झाल्याच्या निमित्ताने , वंदे मातरम् सार्ध शती जयंती समारोह समितीतर्फे आज पुण्यात शाहू लक्ष्मी कला क्रीडा अकादमीच्या सहकार्याने वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. शुभारंभ लॉन्स ते राजाराम पूल आणि परत शुभारंभ लॉन्स असा वॉकेथॉनचा मार्ग होता.
यामध्ये सुमारे दोन हजार नागरिकांनी सहभाग घेतला. यावेळी संपूर्ण ‘वंदे मातरम्’चे सामूहिकरित्या गायन करून जयघोष करण्यात आला. तसच यावेळी वंदे मातरम्’चे संशोधक-अभ्यासक मिलिंद सबनीस यांनी या साहित्यकृतीच्या निर्मितीचा थोडक्यात आढावा घेतला.

**अटक**
एटीएम गॅस कटरने कापून रोकड चोरण्याच्या तयारीत असलेल्या आंतरराज्य टोळीला स्थानिक शिरूर पोलिसांनी अटक केली आहे. चोरट्यांकडून कंटेनर, एटीएम कापण्यासाठी लागणारे गॅस कटर, गॅस टाकी, कटावणी, पहार, दोरी असा १५ लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही टोळी हरियाणा मधील असल्याचं पोलिसांनी सांगितल.

**हवामान**
पुणे परिसरात सकाळी आणि रात्रीच्या वेळी थंडी जाणवत असून, उद्या ही शहरात हवामान कोरड राहून किमान तापमान 16 अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता आहे. तसच सकाळच्या वेळी धुक पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**